पुढारी

# पुणेकरांनी अनुभवली पांडुरंगाची उपासना

- नृत्यांगना कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या सादरीकरणाने श्रोते मंत्रमुग्ध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**चेहऱ्यावरील सूक्ष्म हावभाव, हातांच्या विशिष्ट मुद्रा, लय-तालातील पायांच्या गुंतागुंतीच्या हालचाली आणि शास्त्रीय संगीताच्या साथीने सादर झालेल्या भरतनाट्यममधून पांडुरंगाच्या भक्तीने पुणेकर अक्षरशः न्हाऊन निघाले. फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे 'माउली - एक कालातीत परंपरा' या भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील संबंधाचा उत्सव आयोजित केला होता. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्यांगना, नृत्यदिग्दर्शिका आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या विशेष सादरीकरणातून अनुभवायला मिळाली.**

कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांनी आपल्या नृत्यातून पांडुरंग आणि भक्त यांच्यातील भावबंध उभा केला. डोळे व चेहऱ्यावरील हावभावांइतकेच हातांच्या मुद्रांमधून त्यांनी भक्तीची गहिराई व्यक्त केली. या नृत्याच्या माध्यमातून संपूर्ण विश्व एकरूप असल्याची अनुभूती प्रेक्षकांना झाली. अध्यात्माने समृद्ध असलेल्या भरतनाट्यमच्या माध्यमातून पंढरीच्या वारीचा इतिहास, संस्कृती आणि विविध भावभावना प्रभावीपणे मांडण्यात आल्या. या प्रसंगी फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे, फ्युएल शिक्षण संस्थेच्या सीईओ मयूरी देशपांडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता कुलकर्णी यांनी केले.



आंतरराष्ट्रीय नृत्यांगना कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांचा सन्मान करताना फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे. या वेळी उपस्थित अन्य मान्यवर.

> “ प्रत्येक कलाकाराला समाजाकडून प्रेरणा आणि पाठबळ मिळत असते. त्यामुळे समाजाचे ऋण फेडण्याची जबाबदारी कलाकारांची आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी फ्युएल शिक्षण संस्था करीत असलेल्या कार्याला पाठिंबा देण्यासाठी मी अमेरिकेतून भारतात आले आहे. या कार्यक्रमासाठी मी कोणतेही मानधन स्वीकारलेले नाही.
>
> **- कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर**

> “ वंचित आणि ग्रामीण भागातील महिलांना रोजगारक्षम कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांचा भाग म्हणून दर वर्षी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा आमचा मानस आहे.
>
> **- डॉ. केतन देशपांडे,**
> संस्थापक अध्यक्ष, फ्युएल शिक्षण संस्था